# देवाची सेवा कशी करायची हे एक संदेष्टा दुसूयाला दाखवतो

**प्रार्थना :** ''प्रिय स्वर्गीय पित्या, इतर मुलांना येशूचू आज्ञापालन अधिक चांगल्या रितीने करता यावे यासाठी मदत करण्याकरीता मुलांना तयार करण्यासाठी ह्या अभ्यासाचा कृपा करुन उपयोग करुन घे,''

मुलांच्या सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाजांनुसार **कार्यक्रम निवडा.**



एलीया संदेष्टा आपले सामर्थ्य अलीशाला देतो हा वृत्तांत **2 राजे 2:1-15 मधून वाचून दाखवा.**

- हा कथा वृत्तांत वाचण्यास किंवा लक्षात ठेवून सांगण्यास शक्य असेल तर एखादया मोठया मुलाला तयार करा.
- प्रथम स्पष्ट करुन सांगा की एलीयाने त्याचे काम दुसूया तरुण संदेष्टयावर कसे सोपवून दिले हे ह्या कथा वृत्तांतातून दिसते.
- त्याचप्रमाणे, मुलांनाही, ते देवाविषयी जे शिकतील ते इतर मुलांना सांगितले पाहिजे.

पुढील प्रश्न विचारा. मुलांना बरोबर उत्तर देता आले नाही तरच उत्तर सांगा.

- आपल्या गुरुविषयी अलीशाला किती काळजी होती? *[उत्तर : अलीशा आपल्या वृद्ध गुरुला कुठेही एकटे सोडत नसे.]*
- आपला गुरु आपल्याला सोडून जाणार हे अलीशाला माहित होते का? *[उत्तर : पाहा वचन 3]*
- एलीयाने आपल्या शिष्याला शेवटचा प्रश्न कोणता विचारला? *[उत्तर: पाहा वचन 9]*



- अलीशाला एलीयाकडून काय मिळावे असे वाटले होते? *[उत्तर : पाहा वचन 9]*
- एलीया कोणत्या मार्गाने स्वर्गात गेला? *[पाहा वचन 11]*
- गुरु सोडून गेल्यावर अलीशाला काय वाटले? *[पाहा वचन 12]*
- अलीशाला अतिशय दु:ख झाले. प्राचीन इस्राएलमध्ये लोक त्यांना किती दु:ख झाले हे दाखवण्यासाठी आपले कपडे फाडत असत.

अग्नीच्या ज्वाळा निघत असलेल्या रथाचे मोठे परंतु साधेच **चित्र काढा.** मुलांनी बघून हे चित्र काढावे आणि शक्य असेल तर त्यात रंग भरावेत. मोठया मुलांनी लहान मुलांना चित्र काढण्यात मदत करावी.

**एलीया व अलीशा** ह्यांच्या कथा वृंत्तात्ताचे नाट्यीकरण प्रौढांसाठी करा. मुलांना ही नाटिका प्रौढांसमोर सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढायांशी चर्चा करुन व्यवस्था करा. एलीयासाठी अंगरखा किंवा पायघोळ झगा तयार करा. नाटिकेची तालीम करताना त्यातून शिका.

- मोठया मुलांनी **एलीया** व **अलीशा** ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांनी एलीच्या शिष्यांच्या भूमिका कराव्यात.

**निवेदक :** 2 राजे 2:1-7 मधून वृत्तांत्ताचा पहिला भाग सांगा आणि मग म्हणा, ''एलीया आपल्या शिष्याला अलीशाला काय सांगतो ते ऐका.''

**एलीया :** अलीशाच्या बरोबर चाला आणि म्हणा, ''अलीशा, मला आता गेले पाहिजे माझी वेळ झाली आहे. तू येथेच राहा.''

**अलीशा :** म्हणा, ''अजिबात नाही, मी अगदी शेवटपर्यन्त तुमच्याबरोबर राहणार आहे''.

**एलीयाचे शिष्य :** एका बाजूला उभे राहा. एकजण म्हणतो, ''अलीशा आपण संदेष्टे आहोत. आपल्याला माहित आहे की मी, तुझा धनी, आज स्वर्गात जाणार आहे! माझे काम पुढे कोण सुरु ठेवणार?''

**निवेदक :** वचने 8-14 मधून वृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''एलीया अलीशाला काय म्हणतो ते ऐका''

**एलीया :** तुमचा झगा काढून जमीनीवर जोराने आपटून म्हणा, ''देवाने पाण्याचे दोन भाग केलेले आहेत. आपण पलीकडे जाऊ'' (अलीशा बरोबर चालत जा.) ''आता, जाण्यापूर्वी मी तुझ्यासाठी काय करू?''

**अलीशा :** ''तुम्ही गेल्यावर तुमचे चांगले कार्य पुढे सुरु ठेवण्यासाठी मला देवाचे सामर्थ्य मिळावे अशी माझी इच्छा आहे.''

**एलीया :** ''तू भला स्वर्गात जातांना पाहिलेस तर मग कार्य पुढे सुरु ठेवण्यासाठी देव तुला साहाय्य करील. '' (झगा काढून जमीनीवर टाका. मग खुर्चीवर चढून आपले हात स्वर्गाच्या दिशेने उंचवा.)

**अलीशा :** ''माझ्या बापा, मी अग्नीरथातून तुला वर जाताना पाहिले!'' एक क्षणभर वर बघा आणि मग झगा हातात घेऊ संदेष्टयांच्या गटाच्या दिशेने जा. जमीनीवर झगा आपटा.

**एलीयाचे संदेष्टे :** सर्वजण मोठयाने म्हणा, ''बघा, बघा! त्याने नदीच्या पाण्याचे दोन भाग केले!'' मग एका संदेष्टयाने म्हणावे, ''देवाच्या आत्म्याने त्याला एलीया सारखेच सामर्थ्य दिले आहे!''

**निवेदक :** मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना.

**मुलांनी** हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर एलीया व अलीशा ह्यांच्या वृत्तांत्तासबंधाने वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत.

मुलांना **स्पष्ट करुन सांगा :** खूप खूप वर्षांपूर्वी, येशू पृथ्वीवर मनुष्य म्हणून येण्यापूर्वी, एलीयाने लोकांना देवाच्या आज्ञांचे पालन करण्यास शिकवून शिष्य केले. आता येशू आम्हांला सांगतो त्याचे आज्ञापालन करणायांना शिष्य करा. विचारा....

- इतर मुलांना येशूच्या आज्ञांचे पालन करण्यास आम्हांला कशा प्रकारे मदत करता येईल?
- येशू आणि त्याची सेवा करणे याविषयी शिकव्यास तुम्हांला मदत करता येईल असे तुमचे कोणी भाऊ, बहिण किंवा मित्र-मैत्रीणी आहेत का?

**सामर्थ्याचा झगा दुसूयाकडे सोपवा.**

- मुलांसाठी झग्याचे चित्र काढा.
- एका मुलाला एलीया तर दुसूयाला अलीशा होण्यास सांगा.
- 'एलीया' कडे झग्याचे चित्र देऊन हे देवाच्या सामर्थ्याचे प्रतिनिधीत्व करते असे स्पष्ट करा. म्हणा, ''येशू विषयी इतरांना सांगून त्यांची सेवा करण्यासाठीचे सामर्थ्य आता तुम्हांला मिळाले आहे.''



**स्पष्ट करा**, ''देवाच्या सामर्थ्या बाबतीत आम्ही स्वार्थी असू नये. आम्ही लोकांना शिष्य करतो याचा अर्थ आम्ही देवाचे सामर्थ्य आणि वचन इतर मुलांकडे सोपवून देतो.'' मग 'एलीया' झालेल्या मुलाला झग्याचे चित्र 'अलीशा' कडे देण्यास सांगा.

- मुलांना झग्याचे चित्र काढव्यास सांगा आणि पुढच्या उपासनेच्या वेळी ते मोठया माणसांना दाखवण्यास सांगा.

- एलीयाने त्याचा झगा त्याच्याच शिष्याला दिला, यावरुन आपण देवाचे सामर्थ्य व चांगुलपणा इतरांकडे कशा प्रकारे सोपवतो हे स्पष्ट होते, असा उलगडा प्रौढांना करुन सांगण्यास मुलांची तयारी करुन ह्या.

  **पाठ करा.** योहान 20:21

  **कविता.** स्तोत्र 39 वचने 4, 5 व 7 ही तीन मुलांना प्रत्येकी एक असे म्हणण्यास सांगा.

  मुलांच्या बरोबर **प्रार्थना करा.**

''प्रिय प्रभू, तू केलेल्या प्रत्येक आज्ञेचे पालन करणाऱ्यांना तुझे शिष्य करण्यास तू आंम्हांला सांगितले आहे, आज्ञापालन करण्यास मदत व्हावी यासाठी तू आपले वचन व आत्मा आम्हांला दिलास. आम्हांला चांगले शिष्य होण्यासाठी साहाय्य कर. इतरांना येशू विषयी सांगण्यास आम्हांला साहाय्य कर म्हणजे तेही चांगले शिष्य होतील''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net